# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - http://mumbai.dte.org.in


परिपत्रक

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१४ /1253
दिनांक : 15 MAY 2014

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत
पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.

विषय :- उन्हाळी सुट्टी : शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४

संदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. १०/एनजीपी/उन्हाळी सुट्टी/२०१४/३४९, दिनांक १०.०४.२०१३

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, संस्थेतील जे कर्मचारी (व्हॅकेशनल स्टाफ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने नेमून दिलेल्या सत्राचा कालावधी लक्षात घेऊन शैक्षणिक परीक्षा व उत्तर पत्रिका मूल्यमापनाच्या कामासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग थोपवून **दिनांक २०.०५.२०१४ ते दिनांक २८.०६.२०१४ पर्यंत ४० दिवस उन्हाळी सुट्टी** देण्यात यावी.

तसेच परीक्षा व उत्तर पत्रिका मूल्यमापनाच्या कामासाठी ज्या कर्मचा-यांना थांबविण्यात येईल, ते परीक्षेची कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. संबंधित कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा कामचुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हे संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायत्तता दिलेली आहे, त्या संस्थांमध्ये सत्र अभ्यासक्रम राबविले जातात, तेव्हा त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन, तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेच्या कामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोयीनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापि, सदर सुट्टी ४० दिवसांपेक्षा जास्त असू नये.

( जी.बी.धनोकार )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई.

प्रत:- संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.,मुंबई यांना माहितीकरीता सादर.

D:\p1\Vaction.doc